RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार-ब

वर्ष ११, अंक १४६] गुरुवार, ऑक्टोबर ९, २०२५/आश्विन १७, शके १९४७ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक ३७५

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २६ सप्टेंबर, २०२५

आदेश

महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ आणि नियम, १९६७.

क्रमांक कृबास-०१२५/प्र.क्र.७५/२१-स.— ज्याअर्थी, कृषी उत्पन्न बाजार समिती, गोंदिया, जि. गोंदिया या बाजार समितीच्या आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांमार्फत मार्केट सेस वसूल केला जातो. परंतु कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते आणि इतर खर्च विचारात घेता, होत असलेली वसूली पाहिजे त्या प्रमाणात होत नसल्याचे बाजार समितीच्या निदर्शनास आले आहे. तसेच कोवीड-१९ च्या काळात व लंपी रोगामुळे अधिकृत गुरांचे बाजार बंद राहिल्याने बाजार समितीच्या उत्पन्नावर विपरीत परिणाम होत होता. त्यामुळे उत्पन्नात वाढ करण्याच्या दृष्टीने बाजार समिती गोंदिया यांनी संचालक मंडळ सभा दि.३१.०१.२०२५ रोजीचा ठराव क्र.०५ अन्वये सन २०२५-२६ करीता गुरांचे आठवडी बाजार व बैठकी बाजार ठेका पद्धतीने देण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जि.गोंदिया यांना सादर केला आहे ; आणि,

ज्याअर्थी, कृषि उत्पन्न बाजार समिती, गोंदिया, जि. गोंदिया येथील गुरांचे आठवडी बाजार व बैठकी बाजार ठेका पद्धतीने चालविण्यास दिल्यानंतर बाजार समितीचे उत्पन्न वाढणार असल्याने, त्यास परवानगी देण्यासंदर्भातील प्रस्ताव पुढील कार्यवाहीस्तव पणन संचालक, पणन संचालनालय, पुणे यांनी शासनास सादर केला आहे ; आणि,

ज्याअर्थी, गोंदिया कृषि उत्पन्न बाजार समितीने गुरांचे आठवडी बाजार व बैठकी बाजार ठेका पद्धतीने देण्यामागची शासनास सादर केलेली कारणे लक्षात घेता, बाजार समितीस गुरांचे आठवडी बाजार व बैठकी बाजार ठेका पद्धतीने देण्यास परवानगी देणे उचित राहणार असल्याची शासनाची खात्री झाली आहे.

त्याअर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ मधील कलम ५९ अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करुन, सदर कायद्याच्या कलम ३१ व महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ खालील नियम १९६७ च्या नियम ३३(१) मधील तरतूदीतून सुट देऊन सन २०२५-२६ या कालावधीकरीता कृषि उत्पन्न बाजार समिती, गोंदिया, जि. गोंदिया या बाजार समितीला गुरांचे आठवडी बाजार व बैठकी बाजार ठेका पद्धतीने देण्यास मान्यता देण्यात देत आहे. सदर मान्यता पुढील अटींच्या अधिन राहून देण्यात येत आहेः-

(१) सन २०२५-२६ करीता कृषि उत्पन्न बाजार समिती, गोंदिया, जि. गोंदिया येथील गुरांचे आठवडी बाजार व बैठकी बाजारांचा मार्केट सेसची वसुली करण्यासाठी जाहीर लिलावाने जास्तीत जास्त बोली बोलणाऱ्या व्यक्तीस ठेका देण्यात यावा.

(२) मागील ३ वर्षाच्या गुरांच्या बाजारासाठीच्या सरासरी उत्पन्नापेक्षा ३० ते ३५ टक्के रक्कम जास्त मिळत असेल तरच ठेका देण्यांत यावा.

(३) सदर ठेक्यासाठीच्या निविदा स्थानिक महत्वाच्या वर्तमानपत्रात जाहीरात देऊन किंवा खुल्या हर्रास पद्धतीने मागविण्यात याव्यात.(ज्याद्वारे बाजार समितीस जास्त उत्पन्न मिळेल त्या पद्धतीचा अवलंब करून).

(४) गुरांच्या बाजारामध्ये व आठवडी बाजारामध्ये काम करणारे कर्मचारी हे ठेकेदारांचे राहतील व त्यांच्या वेतनापोटी बाजार समितीने कोणताही खर्च करु नये.

(५) निविदा मागविण्याची व मंजूरी देण्याची प्रक्रिया जिल्हा उपनिबंधकांच्या देखरेख व नियंत्रणाखाली करण्यात यावी. जिल्हा उपनिबंधकांनी मान्यता दिल्याशिवाय कोणतीही निविदा अंतिमतः मंजूर करण्यांत येऊ नये.

(६) सन २०२५-२६ या कालावधीनंतर शासनाची पुनश्च मान्यता घेतल्याशिवाय ठेका पध्दती कोणत्याही परिस्थितीत चालू न ठेवण्याची जबाबदारी कृषि उत्पन्न बाजार समिती, गोंदिया यांच्यावर राहील.

(७) उक्त कालावधीत कृषि उत्पन्न बाजार समिती, गोंदिया, जि.गोंदिया या समितीस गुरांच्या बाजाराचा ठेका दिल्यामुळे कोणतीही तक्रार / न्यायालयीन बाब, इ. उद्‌भवल्यास सदर मान्यता रद्द करण्याचा अधिकार शासनास राहील व सदर मान्यतेमुळे कोणतीही न्यायालयीन बाब उद्‌भवल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी कृषि उत्पन्न बाजार समिती, गोंदिया, जि. गोंदिया यांची राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

माधवी सं. शिंदे,
शासनाच्या अवर सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.